**<u>निशाणी क्र. ०५ वरील आदेश</u>**

प्रस्तुतचा अर्ज हा वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे कलम २६ नियम ९ अन्वये वाद मिळकतीचे अतिक्रमण निश्चित करण्याकरिता मोजणीसाठी न्यायालयीन आयुक्तांच्या नियुक्तीकरिता दिलेला आहे.

०२. वादी यांचे अर्जातील थोडक्यात कथन असे की, वादी यांनी प्रस्तुत दावा अतिक्रमीत जमिनीचा ताबा मिळावा म्हणून दाखल केलेला आहे. अतिक्रमण निश्चित करण्याकरिता तज्ञ व्यक्ती म्हणून टी.आय.एल.आर. यांना न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमण्यात येऊन त्यांना वाद मिळकतीची मोजणी करून प्रतिवादी यांनी केलेल्या अतिक्रमणासंदर्भात अहवाल मागवण्यात यावा अशी विनंती वादी यांनी केली आहे.

०३. प्रतिवादी यांनी निशाणी क्र. १६ वर त्यांचे म्हणने दाखल करून अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

०४. प्रस्तूत अर्ज, वादपत्र, कैफियत आणि दस्तऐवज यांचे अवलोकन केले. वादी यांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. दावा हा वादी यांची <u>मिळकत गट क्र. १९२ क्षेत्रफळ ६ हेक्टर ३२ आर पैकी वादीच्या मालकीची ७८ आर जमिनी पैकी ३ आर जमीन जिची चतुःसिमा पुर्वेस जफरशा कासमशा यांची जमीन, पश्चिमेस रस्ता, दक्षिणेस प्रतिवादीची जमीन व उत्तरेस रस्ता या चतुःसिमेच्या आलीत जमीनीवर प्रतिवादी यांनी अतिक्रमण केले,</u> अशा प्रकारे प्रतिवादी यांनी वादी यांच्या जमिनीवर केलेले अतिक्रमण काढून त्या अतिक्रमीत जमीनीचा ताबा मिळणेकरिता सदरील दावा दाखल करण्यात आलेला आहे. त्यामूळे त्यांच्या जमिनीवर प्रतिवादी यांनी अतिक्रमण केले आहे काय ? आणि केले असल्यास कोणत्या बाजूने व किती क्षेत्रावर अतिक्रमण केले आहे ही बाब अभिलेखावर येणे गरजेचे आहे.

०५. प्रस्तूत दावा हा अतिक्रमणासंदर्भात आहे. वादी व प्रतिवादी यांची

मिळकत जवळजवळ एकमेकांच्या बांधाला लागून आहे. अशा परिस्थितीत अतिक्रमणासंदर्भाचा तपशील तज्ञ व्यक्ती मार्फत अभिलेखावर येणे दाव्याच्या पुर्ण निकालाकरिता आवश्यक आहे. मा. उच्च न्यायालयाने ब–याचशा न्यायनिवाडयामध्ये असे मत नोंदविले आहे की, जेंव्हा एखाद्या जागेसंबंधी, तिच्या ओळखीसंबंधी, चतुःसिमा संबंधी किंवा अतिक्रमणासंबंधी वाद असेल तर अशा वेळेस तज्ञ व्यक्तीमार्फत त्याची मोजणी करणे गरजेचे आहे. सदर मत हे मा. उच्च न्यायालयाने **सुखदेव परशरामजी भुगूल वि. वामनराव नागोराव चरहट २००४ (३) एम.एच.एल.जे. ७२४, तसेच मल्हार वि. शिवाजी २०१४ (४) एम.एच.एल.जे. २३७ व भूपेंद्र वि. हेमराज २०१४ (४) एम.एच.एल.जे. २३१** मध्ये नोंदविलेले आहे.

०६. प्रस्तूत दाव्यातही अतिक्रमणासंबंधी वाद असल्यामुळे सत्य परिस्थिती दाव्याकामी येण्याकरिता न्यायालयीन आयुक्तांची नेमणूक करणे आवश्यक आहे. परिणामी मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहेः

# आदेश

०१. प्रस्तूतचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

०२. तालूका निरीक्षक, भूमी अभिलेख, भोकरदन येथील मोजणीदार यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणूक करण्यात येते.

०३. न्यायालयीन आयुक्त यांना निर्देशित करण्यात येते की, त्यांनी मौजे विझोरा, ता. भोकरदन, जि. जालना येथील वादी यांची मिळकत गट क्र. १९२ क्षेत्रफळ ६ हेक्टर ३२ आर पैकी वादीच्या मालकीची ७८ आर या गटामधील सह भागीदार असल्यास सर्व सह भागीदारांची व प्रतिवादीच्या जमिनींची मोजणी करून सविस्तर मोजणी नकाशा तयार करून, वाद मिळकत गट क्र. १९२ मधील वादीच्या नावे दर्शविलेल्या जमिनीवर काही एक अतिक्रमण असल्यास व ते अतिक्रमण कोणी, कोणत्या बाजूने केले आहे हे त्याच्या क्षेत्रफळासह दर्शवून त्यांचा मोजणी नकाशा अहवालासह या न्यायालयाची रीट मिळाल्यापासून एक महिन्याच्या आत न चुकता सादर करावा. न्यायालयीन आयुक्त यांनी आवश्यकता भासल्यास सदर मिळकतीं व्यतिरिक्त आजूबाजूच्या जमिनीची मोजणी करण्याचीही मुभा आहे.

०४. वादी यांनी न्यायालयीन आयुक्त यांची नियमाप्रमाणे योग्य ती फी भूमी अभिलेख विभागाकडे त्वरीत १५ दिवसाच्या आत भरावी व त्याची पावती दोन प्रतीत न्यायालयात दाखल करावी. तसेच योग्य ते दस्तऐवज संबंधीत कार्यालयात सादर करावेत.

०५. वादी यांनी वरील मुदतीच्या आत फी न भरल्यास व त्याची पावती न्यायालयात दाखल न केल्यास सदर आदेश हा आपोआप रद्द झाला असे समजण्यात येईल.

०६. वादी यांनी तशी पावती न्यायालयात जमा केल्यावर कमिशनर रिट काढण्यात यावी.

स्वाक्षरित/–

दिनांकः ०७.१२.२०२२. (आर. व्ही. पाटील)
भोकरदन. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
भोकरदन

<u>प्रमाणपत्र</u>

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. मधील शब्द न शब्द मुळ निकालपत्राप्रमाणे आहे.

लघूलेखकाचे नावः यु. आर. दसरे
न्यायालयाने नावः दिवाणी न्यायालय क. स्तर भोकरदन
मा. साहेबांनी चेक केले
व पी.डी.एफ. दिनांकः ०७.१२.२०२२

स्वाक्षरित/–
लघुलेखकाची सही